पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**प्रेस नोट** दिनांक : ०६/०४/२०२४

# गोवा राज्यातील विदेशी मद्यसाठयाची महाराष्ट्र राज्यात अवैधरित्या होत असलेली तस्करी रोखण्यात ग्रामीण पोलीसांना यश - सोग्रस फाटा, ता.चांदवड परिसरात ४३ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक सन २०२४ च्या पार्श्वभुमीवर जिल्हयाचे सीमावर्ती भागांतून गुटखा व मद्याची अवैधरित्या होणारी तस्करी रोखण्यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे आदेशानुसार तीव्र स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मुंबई आग्रा महामार्गाने नाशिक ते धुळे बाजुकडे जाणारे एका ट्रक मधून मोठया प्रमाणात अवैधरित्या मद्याची तस्करी होत असल्याची बातमी मिळाली होती. त्यानूसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दि. ०५/०४/२०२४ रोजी मुंबई आग्रा महामार्गावर चांदवड तालुक्यातील सोग्रस फाटा परिसरात वाहन तपासणी सापळा रचुन महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत तसेच गोवा राज्य निर्मित व केवळ गोवा राज्यातच विक्री करीता असलेला खालील वर्णनांचा व किंमतीचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन एका टाटा ट्रकसह जप्त केला आहे.

| | |
|---|---|
| **पोलीस ठाणे / गुरनं** | वडनेर भैरव पो.स्टे. गुरनं ९५/२०२४ भादवि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) |
| **ठिकाण** | मुंबई आग्रा महामार्ग, सोग्रस फाटा, ता.चांदवड, जि.नाशिक |
| **जप्त मद्यसाठा** | गोवा राज्य निर्मीत रॉयल ब्लु व्हिस्कीचे ४४८ बॉक्स किं.रू. ४३,००,८००/- |
| **जप्त वाहन व साहित्य** | टाटा कंपनीचा ट्रक MH-15-HH-6361 व मोबईल फोन किं.रू. १८,०६,०००/- |
| **एकुण मुद्देमाल** | ६१,०६,८००/- रूपये |
| **आरोपींची नावे** | १) पदमसिंग कैलास बजाड, वय ३५, रा. जळकु, ता. मालेगाव, जि.नाशिक, हल्ली रा. अश्विननगर, सिडको, नाशिक<br>२) संशयीत पाहिजे मद्य पुरवठादार व मद्य विकत घेणारे अज्ञात इसम |

यातील आरोपी पदमसिंग कैलास बजाड याने गोवा राज्यातुन मद्यसाठा ट्रकमध्ये भरून बिल न बनविता ट्रकमध्ये अमोनियम क्लोराईड टाईप पावडरचा माल असल्याचे भासवून त्याचे बनावट बिल पावत्या तयार करून त्या ख-या असल्याचे भासवून अवैधरित्या विदेशी मद्य विक्रीच्या उद्देशाने स्वत:चे कब्जातील ट्रकमध्ये वाहतुक करतांना मिळून आला असुन त्यास वरील गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस मा. न्यायालयासमोर हजर केले असता, त्याची ०६ दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकातील सपोनि श्री. गणेश शिंदे व अंमलदार करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने व अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोनि गणेश शिंदे, पोउनि नाना शिरोळे, पोहवा नवनाथ सानप, संदिप नागपुरे, मेघराज जाधव, प्रविण गांगुर्डे, पोना हेमंत गिलबिले, विनोद टिळे, विश्वनाथ काकड, प्रदिप बहिरम, कुणाल मोरे, नवनाथ वाघमोड यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.